# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व विभाग व अधिविभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, **Hiring Services** अंतर्गत सेवा उपलब्ध करून घेण्यासंदर्भात अधिकार मंडळाच्या मंजूरी मिळाली होती. सदर सेवा घेणे संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.३/१०/२०१९ रोजीच्या बैठकीत ठरलेनुसार तयार करण्यात आलेली नियमावली जा.क्र.आस्थापना/४४१० दि.४/११/२०१९ या परीपत्रकान्वये निर्गमीत करण्यात आले होती.

याबाबत विविध विभाग व अधिविभागांना येणा—या अडचणी बाबत उपरोक्त गठीत समितीची दि.१४/१/२०२० रोजी बैठक संपन्न झाली. त्यानुसार तयार करण्यात आलेली सुधारीत नियमावली खालीलप्रमाणे—

१. Hiring Services अंतर्गत सेवा उपलब्ध करून घेणेकरीता तांत्रिक पदांच्या व विशेष कौशल्य आधारीत सेवा घेण्यात याव्यात. सदर सेवा प्लंबिंग, इलेक्ट्रिक, बांधकाम, सुतारकाम, बागकाम, पंप ऑपरेटींग, टेलीफोन ऑपरेटींग/टेक्निशियन, कॉम्प्युटर ऑपरेटींग/प्रोसेसिंग, डाटा ॲडमिनिस्ट्रेशन, स्कॅन स्टेशन ऑपरेशन, बायडींग, डीटीपी ऑपरेटींग, डाटा ॲनालायझिंग/रिसेप्शनिंग इ. या मुद्यांबाबत असाव्यात.

२. उपरोक्त तांत्रिक पदांची शैक्षणीक अर्हता व अनुभव हे ज्या त्या पदांना जे लागू आहे ते राहतील. संबंधीत विभागाने आवश्यक सेवा देणाऱ्या व्यक्ती शोधून सेवा उपलब्ध करून घेणेबाबत मा.प्र—कुलगुरू यांची मान्यता घेण्यात यावी. संबंधीत व्यक्तीस कोणत्याही प्रकारे लेखी स्वरूपात नियुक्ती आदेश देण्यात येवून नये. सदर पुर्ण प्रस्ताव संबंधीत विभागाकडे ठेवण्यात यावेत. तसेच अशा पध्दतीने नेमणूक झाल्याबाबतची माहिती (सोबतच्या तक्त्याप्रमाणे) आस्थापना विभागास माहीतीसाठी सादर करावी.

३. अधिकार मंडळांने मंजूर केलेल्या अर्धकुशल सेवक रू.५००/— प्रतीदीन, कुशल सेवक रू. ७५०/— प्रतीदिन व विशेष कुशल सेवक रू.१०००/— प्रतीदिन या दरानुसार संबंधीत व्यक्तींच्या सेवेचे काटेकोरपणे मुल्यमापन पडताळणी करण्यात यावी. संबंधीत विभागांचे अधिका—यामार्फत देयक प्रमाणीत करून परस्पर अधिकार प्रदान नियमावलीनुसार सक्षम अधिकारी यांची मान्यता घेवून वित्त विभागास सादर करून पुढील कार्यवाही संबंधीत विभागामार्फत करण्यात यावी. तसेच ही सेवा, सेवा म्हणून घेण्यात येत असताना त्यांचे देयक Hiring Service म्हणून अदा करणेत यावे.

४. सदर सेवा देणाऱ्या व्यक्तिची वयाची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी राहील.

५. Hiring Service अंतर्गत सेवा घेताना वयोमर्यादा वर्षे ४३ किंवा त्यापेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तींकडून अपवादात्मक परीस्थितींमध्ये सेवा घ्यावयाची झालेस सदर सेवा ११ महीन्यांकरीता घ्यावी. तसेच सदर सेवा एकाच व्यक्तीकडून दोन वेळा घेताना दोन कालावधीमध्ये ११ महीने खंड देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने ज्या व्यक्तीकडून सेवा उपलब्ध करून घ्यावयाची आहे त्यांचेबाबत भविष्यात कायदेशीर बाब उद्‌भवू नये म्हणून याबाबत संबंधीत विभागाने पुढील कार्यवाही करतेवेळी योग्य ती काळजी घ्यावी व कायदेशीर बाबी तपासाव्यात.

६. सेवा पुरविणाऱ्या व्यक्तीच्या कामाची स्वतंत्र वर्कशीट संबंधित विभागाने ठेवावी व त्यानुसार मेहनताना आदा करावा. सदर वर्कशीटची १५ दिवसातून संबंधीत उपकुलसचिव यांनी तपासणी करून त्यावर शेरे नोंदवावेत.

७. ज्या दिवशी संबंधित व्यक्ती सेवा देण्यासाठी येतील त्या दिवशी संपुर्ण दिवसाचे काम उपलब्ध असेल याची खातरजमा विभागप्रमुखांनी करूनच त्या दिवशी अशा सेवा घ्याव्यात.

८. सदर Hiring Services अंतर्गतचा आढावा तीन महिन्यातून एकदा व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावयाचा असल्याने संबंधितांनी त्याबाबतची माहिती आस्थापना विभागास खालील तक्त्याप्रमाणे सादर करणे बंधनकारक राहील व सदर सर्व्हिसेससाठी मा.प्र–कुलगुरू यांची मान्यता घेण्यात यावी.

| अ. क्र. | सेवा प्रकार | सेवा पुरविणा–या व्यक्तींची संख्या | केव्हा पासून सेवा घेण्यात येते | सदर सेवा पुढे किती कालावधीसाठी आवश्यक आहे. | या कालावधीतील प्रतिमाह देण्यात आलेले मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

९. तसेच पेज बेसिस संगणक चालक व त्या सारख्या अन्य घेण्यात येत असलेल्या सेवा संदर्भात मागविलेली माहीती ब–याच विभागाकडून प्राप्त झालेली नाही. यास्तव खालील तक्त्यांमध्ये गत ०३ वर्षामधील प्रतिमाह देण्यात आलेले मानधन संदर्भातील माहिती आस्थापना विभागास **तात्काळ** देण्यात यावी.

| अ. क्र. | सेवा प्रकार | संख्या | केव्हा पासून सेवा घेण्यात येते | गत ०३ वर्षातील प्रतिमाह देण्यात आलेले मानधन |
|---|---|---|---|---|
| | | | | |

यानुसार Hiring Services अंतर्गत सेवा उपलब्ध करणेबाबत ज्या त्या विभागाकडून उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात यावी.

कुलसचिव

**जा.क.आस्थापना/1201**

**दि.** 28 JUL 2020

1. सर्व विभागप्रमुख/संचालक/समन्वयक/अधिविभागप्रमुख
2. सर्व उपकुलसचिव, सहा.कुलसचिव, कायदा अधिकारी
3. मा.कुलगुरू/प्र–कुलगुरू/कुलसचिव/संचालक–परीक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
4. समन्वयक, विद्यापीठ संकेतस्थळ कक्ष – सदरचे परिपत्रक Intranet वर ठेवावे.